# प्रबोधन चळवळ आणि मराठी नाटक यांचा अनुबंध

**प्रा. दत्ता पाटील**
मराठी विभाग प्रमुख,
डॉ.घाळी कॉलेज, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर
भ्रमनध्वनी: ९४२१२८९६२७

*''एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात उदयास आलेल्या महाराष्ट्रातील प्रबोधन चळवळीमुळे समाजजीवन ढवळून निघत होते. नवशिक्षितांनी देश, समाज व स्वथिती यामध्ये महत्वपूर्ण परिवर्तन घडवून आणण्याची खटपट सुरु केली होती. अर्थात स्वातंत्र्यपूर्व कालखंडात महाराष्ट्रातील प्रबोधन चळवळीमुळे जे सामाजिक पर्यावरण तयार होत होते त्यामध्ये मराठी सामाजिक नाटकाच्या निर्मिती प्रेरणा पहावयास मिळतात. या दृष्टीने मराठी नाटकाच्या रंगरुपात प्रबोधनकालीन समाजजीवनाचे रुप एकवटलेले दिसते. प्रबोधनकालीन सामाजिक पर्यावरण हेच मुळी तत्कालीन सामाजिक नाटकाचे निर्मिती स्त्रोत होय. याबरोबर नाटकाचे हे समाजाधिष्ठित रुप समस्या दर्शनासाठी व त्याच्या निराकरणासाड़ी तत्कालीन नाटककारांना उपयुक्त वाटले. या दृष्टीने स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील प्रबोधन चळवळ आणि मराठी नाटक यांच्या अनुबंधाविषयी घेतलेला वेध.''*

व्यक्ती आणि समाज यांच्या संबंधातून अनेक प्रश्न निर्माण होत असतात. समाजाची वा व्यक्तीची स्थितिप्रीयता, पारंपारिकता आणि विशिष्ट वर्गाचे हितसंबंध यामुळे समाजजीवनात समस्या जन्म घेऊ लागतात. या समस्यांचे निराकरण करण्यासाठी प्राप्त परिस्थितीनुसार समाजस्थितीत बदल करण्यासाठी जी धडपड करावी लागते तेथेच प्रबोधनात्मक चळवळींचा उगम होतो. साहित्य हे समाजजीवनाचा वेध घेते या न्यायाने नाटकाच्याद्वारा सामाजिक सुधारणेचा विषय प्रतिपादन करण्याची प्रवृत्ती प्रबोधन काळात निर्माण झाली आणि नाटक लिहून तो विषय रंगभूमीवर आणण्याची नवीन प्रथा प्रबोधन काळात सुरु झाली. म्हणजे मराठी सामाजिक नाटक हा सांस्कृतिक संक्रमणातून सिद्ध झालेला कलाप्रकार आहे. समाजाच्या सर्वच क्षेत्रात घडून येत असलेले नव विचार जागरण, धार्मिक जीवनातील असलेल्या बंधनांची शिथिलता, बुद्धिवादी दृष्टिकोण, साहित्यक्षेत्राला प्राप्त होत असलेला नवा दृष्टिकोण या सर्वांच्या क्रिया-प्रतिक्रियातून महाराष्ट्रातील जीवन प्रवाहशील झाले. याचा परिणाम म्हणून स्वाभाविकच नाटकासारख्या प्रयोगशील कलाप्रकारची वाढ झाली.

'नाटक' हे मराठी समाजाच्या संस्कृतीचे एक महत्वाचे अंग आहे. नाटक ही एक सामुदायिक कला असल्यामुळे तिचा उद्‌भव किंवा परिणती यांचा समाजाच्या परिस्थितीशी फार निकटचा संबंध आहे. त्यामधून समूह मनाचे, समूह जीवनाचे दर्शन घडते. त्यामुळे हा कलाप्रकार जीवनाशी अधिक जवळीक साधणारा आहे. जीवनाचे पैलू विविधांगानी व्यापक रीतीने सांगणारा व सामाजिक प्रश्नाची गुंतागूंत समाज मनासमोर मांडणारा आहे. रंजन आणि उद्‌बोधन हे नाटकाचे दोन प्रधान हेतू आहेत. रंजन हे तिचे प्राथमिक कार्य असले तरी तोच तिचा प्रकृतीधर्म नव्हे. म्हणून श्री. ना. बनहट्टी म्हणतात,''सुसंस्कृत समाजात केवळ रंजकता ऐवढाच तिचा प्रकृतीधर्म राहू शकत नाही. रंजना बरोबर व्यंजन किंवा प्रकटन (Expression) आणि प्रभावन (Power) हे धर्म तिच्यात येऊ

लागतात. जे मन कलात्मक निर्मितीच्या व्यापारात गढते त्याला त्या कलेच्याद्वारे काहीतरी सांगावे, प्रकट करावे असे वाटू लागते.''[१] म्हणजे अस्सल कलाकृतीतून त्या त्या काळाच्या सामाजिक, सांस्कृतिक जाणिवा ह्या तरलपणे सूचित झालेल्या असतात. एखाद्या समाजाच्या संस्कृतीचे अंतरंग, मानसरूप आणि मूल्यव्यवस्था ही सखोलपणे उलगडण्यासाठी, समजण्यासाठी त्या काळातील कलाकृतीच जास्त महत्वाची ठरते. या दृष्टीने स्त्री सुधारणेच्या चळवळीचा विचार व्यक्त करणारे अण्णा मार्तंड जोशी यांचे 'संगीत सौभाग्यरमा अथवा वैधव्य दु:ख विमोचन' (१९८४), 'संगीत रुढीविनाशन नाटक'-दत्तात्रय जनार्दन मराठी (१९००), 'प्रौढविधवाविवाह नाटक'-लक्ष्मण गोपाळ देशमुख (१९१०), 'विधिनिषेध नाटिका'- के.सी.ठाकरे (१९३४) इत्यादी तसेच अस्पृश्यता निर्मूलनाच्या चळवळीचा विचार व्यक्त करणारे 'संगीत धर्मरहस्य अथवा अंत्यजोद्धार'-दामोदर विश्वनाथ नेवाळकर (१९०९), 'संगीत अु:शाप'- विनायक दामोदर सावरकर (१९२७), 'पतितोद्धार'- न.रा.ढोले (१९३२), 'खरा ब्राम्हण'-के. सी.ठाकरे (१९३३), 'ते आपले घर'-साने गुरुजी (१९३९) इत्यादी तसेच शेतकरी व कामगार जागृतीविषयक विचार व्यक्त करणो अनुक्रमे 'तृतीयरत्न'- म. जोतीराव फुले (१८५५), 'माझी जमीन'-गणेश कृष्णशास्त्री फाटक (१९३०), 'संगीत गिरणीवालारू- म.ना.जोशी (१९११), 'डेक्कन क्वीन'- गणेश कृष्णशास्त्री फाटक (१९३२), 'सोन्याचा कळस'- भा.वि. वरेरकर (१९३३) इत्यादी तसेच व्यसनाधिनता विरोधी चळवळीसाठी विचार व्यक्त करणारे 'संगतीविपाक नाटक'- द.वि.गोखले (१८८६), 'एकच प्याला'- राम गणेश गडकरी (१९१७), 'कोरडी करामत'- भा.वि.वरेरकर (१९३९), तसेच धार्मिक सुधारणाविषयक चळवळी संदर्भात विचार व्यक्त करणारे 'तृतीयरत्न' -म. जोतीराव फुले (१८५५), 'संगीत दंभस्फोट'-रघुनाथ कृष्ण पिंपळखरे (१९१५), 'संन्याशाचा संसार'-भा. वि. वरेरकर (१९१९), 'बुवा'-श्रीपाद नरसिंह बेंडे (१९३४), 'ते आपले घर'-साने गुरुजी (१९३९) इ. कितीतरी नाटकांचे उदाहरणे या बाबतीत देता येतील. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात साधारणपणे १८० ते २०० पर्यंत अशाप्रकारची नाटके पहावयास मिळतात. अशा नाट्यकृतीचा आणि तत्कालीन प्रबोधन चळवळींचा, ती मधील सामाजिक पर्यावरणाचा अनुबंध महत्वाचा आहे. किंबहुना हा एक स्वतंत्र संशोधनाचा विषय ठरावा इतका व्यापक आहे.

१८४३ साली विष्णूदास भावेंनी 'सीतास्वयंवर' हे पहिले पौराणिक विषयावर आधारित मराठी नाटक (खेळ) करुन दाखविले. त्यांचे नाटक हे सुरुवातीला मूलत: राजरंजनाकरिता होते. नंतर ते लोकरंजनाकरिता पुढे आले. विष्णूदासापासून ते साधारणपणे आण्णासाहेब किर्लोस्करांच्यापर्यंत या जवळ जवळ सदतीस वर्षांच्या काळात मराठी नाटकाचा बराच विकास झाला. या काळात नाटक हे लोकरंजनाबरोबर लोकजागृतीकरिता प्रचारात आले. या संदर्भात असे म्हणता येईल की, अण्णासाहेब किर्लोस्करांपासून मराठी सामाजिक नाटके ही संगीतीत होऊ लागलेली आढळतात. याचे मुख्य कारण असे की, तत्कालीन प्रबोधन चळवळीमुळे प्रभावित होऊ लागलेली आढळतात.याचे मुख्य कारण असे की, तत्कालीन प्रबोधन चळवळीमुळे प्रभावित होऊन असे अनेक नाटककार नाट्यलेखन करत असलेले दिसतात. प्रबोधन चळवळीतील अनेक विषय, घटना, प्रसंग हे तत्कालीन कित्येक नाटकांची मुख्य सामग्री आहे. तसेच या काळात उदयाला येणारी बरीचशी नाटके प्रायोगिक स्वरुपाची होती. सुरवातीचा काळ तरी नाटकाचे अवस्थांतर आपणाला प्रायोगिक रंगभूमीवरच शोधता येईल. रंगभूमीवरील ही धडपड अर्थात बाहेर समाजात चाललेल्या सांस्कृतिक चळवळीचे आणि सामुदायिक व मानसिक विकासाचे प्रतीक असलेली दिसते. म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावधीत उदयाला आलेल्या प्रारंभीच्या नाटकाचा विषय हा पौराणिक होता. पण पुढे, या शतकांच्या उत्तरार्धात व विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील बहुतांश नाटकांचा विषय हा प्रबोधन चळवळीशी सुसंगत असलेला दिसतो.

या काळात ब्रिटीशांची राजवट स्थिर झाल्यामुळे भारतीय समाजजीवनात सुसूत्रता येत होती. शिक्षणप्रसारामुळे नवशिक्षितांच्या पिढीचा उदय झाला होता. त्यांनी लोकजागृतीला सुरवात केली होती. स्त्री-दास्य विमोचन,

शैक्षणिक सुधारणा, अस्पृश्यता निर्मूलन, देशभक्ती, देशहितासाठी सर्वस्वाचा त्याग अशा अनेकविध विषयाशी निगडित समाजसुधारणेच्या चळवळी या काळात सुरु होत्या. या चळवळीमधील अनेक बीजे स्वीकारुन या काळात मराठी नाटक असे रंगभूमीवर येत होते तद्वतच मराठी प्रहसनसुध्दा रंगभूमीवर अवतरलेले दिसते. ''१८५६ मध्ये मुंबईसच 'उमरचंद वाडीकर नाटककार' हे आपले खेळ करु लागले. त्यांनी पौराणिक नाटकांच्या जोडीने 'लोकोपयोगी,हासण्याजोगा' फार्स करुन दाखविण्याची नवीन टूम सुरु केली.''[२] अर्थात त्यावेळच्या मुंबईतील इंग्रजी समाजामध्ये जे प्रहसनवजा नाटकांचे प्रयोग होत असत त्यांच्या अनुकरणाने हा प्रकार मराठी रंगभूमीवर आला असला तरी त्या 'फार्स' चे विषय हे बहुशा तत्कालीन प्रबोधन चळवळीतील असलेले दिसतात. त्यातून स्वत:च्या दोषाविषयी लोकांना खळखळून हसायला लावले, कधी तत्कालीन सामाजिक स्थितीविषयी, प्रश्नांविषयी, आपली अनुकूल प्रतिकूल मतेही प्रकट केली. कधी सुधारकांची रेवडी अडवली, तर कधी सनातन्यांची टोपी उडविली व त्यांच्या स्वार्थी, हीन वृत्तीवर विनोदाच्या माध्यमातून कोरडे ओढले. प्रेक्षकांना हसविणे हे प्रहसनाचे मुख्य उद्दिष्ट असले तरी, कित्येक मराठी प्रहसनांमधून एकोणिसाव्या शतकातील सामाजिक स्थितीगतीचे, आचारविचारांचे आणि सनातनी व सुधारणावादी चळवळीचा जोर वाढला, ती व्यापक बनत गेली, सनातनी शास्त्री मंडळींना अनिष्ट रुढी आणि परंपरा यांचे समर्थन करता येणे अशक्य झाले होते. त्यामुळे स्वत:चे गुण सांगण्यापेक्षा दुसऱ्याच्या वागण्यातील दोष दाखविण्याचा मार्ग त्यांनी स्वीकारला. म्हणून ''साािजक स्थित्यंतरामुळे निर्माण झालेल्या प्रवाहाची दखल घेण्यासाठी मध्यमवर्गीयांच्या वृत्तींतून उपहासपर प्रहसने लिहिली गेली.''[३] या प्रहसनातून सामाजिक समस्यांवर विडंबनात्मक मतप्रदर्शन केले. हे करत असताना कधी उपहास, उपरोध यांचा आश्रय घ्यावा लागला. स्त्री स्वातंत्र्य, बालविवाहास विरोध, विधनापुनर्विवाह, व्यवसनाधिनताविरोधी विचार आदी तत्कालीन समाजजीवनातील कित्येक गोष्टीवर आधारित प्रहसनांचा आशय बेतलेला दिसतो, म्हणून प्रहसनाची मुख्य सामग्री ही सामाजिकता आहे असे म्हणावेसे वाटते. या दृष्टीने प्रबोधन चळवळीचे समर्थन करणारे 'वैदिकी हिंसाधर्मतत्व प्रहसन'-लक्ष्मण मोरोबा कार्लेकर (१८८३), 'बालावृद्धविवाह परिणाम'-विश्वनाथ नारायण वागळे (१८८६), 'चमत्कारिक स्वप्न अथवा बालविवाह व विधवाविवाह विचार'-सीताराम रघुनाथ अधिकारी (१८८६), 'संगीत लग्नसमारंभ'-बा.म. प्रभुणे (१८८२),'वरणभाताचे प्रहसन अथवा विजोड्याचा मनोरंजक फार्स'- द.वा. जोगळेकर (१८११) तर प्रबोधन चळवळीला विरोध करणारी ना.ह. भागवतांची मोर एल.एल.बी. (१८८२) सारखी कितीतरी प्रहसने यांचा विचार या बाबतीत महत्त्वाचा वाटतो. प्रबोधन चळवळ आणि मराठी नाटक यांचा अनुबंध पाहत असताना या अनुबंधाच्या बाबतीत प्रहसनांचाही विचार महत्वाचा वाटतो. म्हणून ''सामान्यत: मराठी नाटक व प्रहसन प्रचलित राजकीय व सामाजिक समस्यांचे उद्घाटप करण्यासाठीच प्राय: लिहिले व राबविले गेले आहे.''[४] तसेच गो.म.कुलकर्णी म्हणतात, ''सामाजिक,राजकीय, प्रचाराचे वा संस्कृतिविषयक अभिमान जागृत करण्याचे एक हुकमी साधन म्हणूनही नाटकांना महत्व चढले.''[५] म्हणजे तत्कालीन नाटकातून व प्रहसनातून जो समाजसुधारणेचा विचार व देशाभिमानाची भावना व्यक्त झाली आहे ती प्रबोधन चळवळीतूनच आलेली दिसते. कालक्रमाने हा प्रबोधनाचा विषय प्रबळ होत होत मराठी रंगभूमी या विचाराची वाहक बनलेली दिसते. मराठी नाटकातून जो सामाजिक विषय मांडला जाऊ लागला या संदर्भात श्री. ना. बनहट्टी म्हणतात,'' नाटकांच्याद्वारा सामाजिक विचार किंवा सुधारणेचा विषय प्रतिपादन करण्याची प्रवृत्ती कधीही कमी झाली नाही... मुद्दा इतकाच की संगीतात सामाजिक नाटके होऊ लागली. इतकेच नव्हे तर पौराणिक संगीत नाटकही सामाजिक विचारांचे वाहक होऊ लागले.''[६] म्हणजे सामाजिक विचार प्रकट करण्याचे मुख्य साधन म्हणून या काळात मराठी नाटकाकडे पाहता येईल. सामाजिक व्याधीचे प्रकटण करणारे आणि पुरोगामी विचारांचे मतप्रदर्शन व सुधारणेचे मंडन करणारे अनेक विषय मराठी नाटकांतून अवतरलेले दिसतात.

प्रबोधन काळात सनातन्यांच्या प्रतिगामी विचाराच्या प्रेरणेनेही प्रभावित झालेला एक वर्ग होता. याचा परिणाम म्हणून सुधारणेचे खंडन करणारी काही नाटके या काळात उदयाला आलेली दिसतसत. देशात एखाद्या सामाजिक किंवा राजकीय प्रश्नावरुन चळवळ झाली व प्रक्षोभ झाला की, त्यावर नाटक लिहून ते रंगभूमीवर आणण्याचा नवा शिरस्ता १८८० नंतर अधिक बळ धरु लागलेला दिसतो. अर्थात समाजामध्ये जागृती, खळबळ आणि चळवळ वाढत असल्याचा तो परिणाम होय. या संदर्भात अनंत देशमुख म्हणतात, ''सुधारक व सनातनी, दोघेही आपले विचार नाट्यकृतीतून मांडू लागले. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरपर्यंत सुधाकरांचे व मनातन्यांचे तुंबळ वैचारिक युध्द नाटकांद्वारे झाले आहे. असे मजेचे चित्र दिसते. काही झाले असले तरी वास्तवाची प्रखर चित्रे त्यात रंगविली गेली हे खरे.''[७] म्हणजे सामाजिक विचार व भावना प्रकट करण्याचे रंगभूमी हे एक प्रभावी साधन आहे. असे मराठी नाटककारांनी जाणल्यामुळे या काळात मराठी नाटकाचा विकास होत गेलेला दिसतो. त्यातूनच प्रबोधनाची चळवळ आणि मराठी नाटक यांचा घनिष्ठ संबंध निर्माण झाला असे वाटते. समाजसुधारणेची चळवळ आणि मराठी नाटक यांच्या अनुबंधासंदर्भात के. नारायण काळे लिहितात,''नाटकाचे प्रधान कार्य काहीतरी शिकविणे, तत्वप्रचार हे आहे. हे एकदा गृहितकृत्य मानल्यावर सामाजिक विचारांच्या प्रचारासाठी त्याचा वापर करण्याचा उपक्रम होणे अपरिहार्य होते. पाश्‍चिमात्य संस्कृतीच्या परीचयानंतर, समाजरचनेत व समाजसुधारणेच्या विचारात जी क्रांती होऊ लागली ती मधील परस्परविरोधी प्रवृत्तींच्या समर्थनासाठी किंवा खंडणासाठी नाटकाचा वापर करण्याची प्रबळ प्रेरणा असलेली काही साहित्यिक, नाटकाचा त्या दृष्टीने वापर करण्यास सिद्ध झाले.''[८] म्हणजे मराठी सामाजिक नाटकाच्या निर्मितीच्या प्रेरणा ह्या त्याकाळातील पर्यावरणातच आढळतात. त्यामुळे या काळातील सामाजिक संदर्भाशिवाय तत्कालीन नाट्यकृतींचे आकलन अपूर्ण राहावे इतका त्याचा सामाजिक जीवनाशी अतूट संबंध आहे. म्हणून वि. पा. दांडेकर म्हणतात, ''हजारो मैलावर पृथ्वीच्या पोटात झालेला धरणीकंप सिस्मोग्राफमध्ये आलेखिला जातो. आमच्या येथील सामाजिक रंगभूमी ही त्या सिस्मोग्राफसारखी सूक्ष्म आंदोलने व्यक्त करणारी आहे आणि म्हणूनच महाराष्ट्रीय समाजात आत्तापर्यंत झालेल्या लहान मोठ्या सर्व आंदोलनांचे पडसाद आमच्या कलापूर्ण साजिक नाटकांत उत्तमप्रकारे उमटलेले आहेत.''[९] नाटकाचे हे समाजाधिष्टित रुप समस्यादर्शनासाठी व त्याच्या निराकरणासाठी तत्कालीन नाटककारांना उपयुक्त वाटले. त्याचा साधन म्हणून त्यांनी उपयोग करुन घेतला. अर्थात समाजजागृतीसाठी नाटक या भूमिकेचा त्यांनी जाणीवपूर्वक उपयोग केलेला दिसतो. यावरुन प्रबोधन चळवळ आणि मराठी नाटक यांचा दृढ संबंध हा अधिक स्पष्ट होण्यासारखा आहे.

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात देशातील राजकीय चळवळ जशी अधिकाधिक तीव्र बनत चालली होती, तशी या राजकीय प्रक्षोभाला अप्रत्यक्षरितीने वाट करुन देण्यासाठी आणि राजकीय विचारांचे महत्त्व जनमनाला पटवून देण्यासाठी तत्कालीन नाटककारांनी रंगभूमीचा आधार घेतलेला दिसतो. राजकीय प्रक्षोभ आणि आकांक्षा उद्‌भुतरम्य कथानकाच्या आधारे अप्रत्यक्षरित्या व्यक्त करण्याची पध्दत तत्कालीन नाटककारांनी अवलंबिलेली दिसते. यातून मराठी नाट्य वाड.मयाच्या परंपरेत रुपकात्मक नाटकाचा नवा प्रवाह जन्माला आलेला आहे. कल्पनेची चमत्कृती आणि त्यातून प्रतित होणार सूचित अर्थ हा रुपकात्मक नाटकाचा एक प्रमुख आणि प्रभावी गुण आहे. म्हणजे कल्पकता, मार्मिकता आणि सूचकता या गुणांच्या अंतर्भावासोबत कलावंताच्या प्रतिभेची विशालता हा ही महत्वाचा गुण या नाटकातून व्यक्त होताना दिसतो. तत्कालीन राजकीय परिस्थितीबरोबर जीवनाविषयीचे प्रगाढ चिंतन या नाट्यकृतींतून अभिव्यक्त होताना दिसते. ''रुपकात्मक नाटकाच्या या नव्या प्रवाहामुळे मराठी रंगभूमीला एकप्रकारे फायदाच झाला. पौराणिक नाटकातील तोच तो पणा याला बगल देऊन, पण त्यातील काही चांगली गुणवैशिष्ट्ये स्वीकारुन (पौराणिक पात्रे, कथाप्रसंग इ.) त्या आधारे समकालीन वास्तवातील सामाजिक विषय गुंफून, विचारप्रवर्तक अशी ही नाटके उदयाला आली.''[१०] म्हणजे समकालीन राजकीय, सामाजिक व

धार्मिक परिस्थितीवर भाष्य करण्याच्या हेतूने रुपकात्मक नाटक उदयाला आले. पण हे भाष्य अप्रत्यक्ष रीतीने म्हणजे रुपकात्मकरीतीने व्यक्त झाले आहे. तत्कालीन नाटककारांनी अत्यंत कौशल्याने आणि सामर्थ्यांने हा नाट्यकलाप्रकार हाताळलेला दिसतो. या नाटकातील सूचकतेने पण अचूक रीतीने केलेले सत्यदर्शन महत्वाचे आहे. अर्थात अप्रत्यक्षरित्या व्यक्त करणे याचे कारण असे की, तत्कालीन सरकारी रोषाला बळी पडणे टळावे आणि वाङ्.मयदृष्ट्या असे अप्रत्यक्ष चित्रण करणे हे कलादृष्ट्या अधिक उपयुक्त ठरते हा विचार त्यामध्ये होता. या दृष्टीने 'लोकमत विजय, अथवा केवळ सुष्ट, दुष्ट मनोविकारांचा एक विचित्र खेळ' (१८९८), 'कीचकवध' (१९०७), 'संगीत भस्मासूर' (१९०७), 'स्वराज्यसुंदरी' (१९०९), 'संगीत मथुरा' (१९२२), 'संगीत मेनका' (१८२६) इत्यादी नाटके महत्वपूर्ण स्वरुपाची आहेत.

साहित्य हे स्वभावताच समाजाभिमुख असते. पण त्या साहित्यात समाजाचे स्थिर चित्रण असत नाही. तर सामाजिक परिवर्तनाचे दर्शन त्यातून घडते. समाजातील परस्परविरोधी घटकांचे संबंध हे द्वंद्वात्मक असतात. तसेच या घटकांतील अंतर्विरोध आणि संघर्ष यातूनच समाजाचा विकास होत असतो आणि जे श्रेष्ठ साहित्य असते त्यातून त्या त्या काळातील अंतर्विरोधाचे व या अंतर्विरोधामागील सामाजिक गतिमानतेचे प्रतिबिंब उमटलेले असते. या संदर्भात लालजी पेंडसे म्हणतात,'' जर साहित्यात उमटणारे विचारप्रवाह व विचारसरणी समाजातील अंतर्विरोधाला अधिकाधिक गतिमान करणारी असतील, म्हणजेच विद्यमान अंतर्विरोधाशी त्या विचारसरणीचा अनुयोग साधन असेल तर साहित्याला प्रागतिक म्हणावयाला काही हरकत नाही!''[११] स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील मराठी नाटकात तत्कालीन समाजजीवनातील अशा विचारणीतील अंतर्विरोधाचे चित्रही स्पष्टपणे व्यक्त होताना दिसते.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात महाराष्ट्रात संमतीवयाच्या वादापासून अगदी घटस्फोटाच्या प्रश्नापर्यंत सनातनी आणि सुधारक यांच्यात प्रचंड वैचारिक संघर्ष झाले. या संघर्षातूनच प्रबोधन चळवळीचे पाऊल प्रत्येकवेळी पुढे पडत गेले. या सर्वांचे प्रतिबिंब तत्कालीन काळात स्त्री समस्यांचे दर्शन घडविणारी जी नाटके उपयाला आली त्यामध्ये स्पष्ट दिसते. तत्कालीन सामाजिक घटना आणि चळवळीतील काही विषय घेऊन जी नाटके तयार झाली व जी रंगभूमीवर आली त्यांचेही उद्दिष्ट अशा स्वरुपाचेच असल्याचे निदर्शनास येते. समाजाच्या जीवनातील प्रचलित महत्वाचे प्रश्न नाटकांच्याद्वारा मांडून समाजमन जागृत करणे. जागृत स्त्री, पुरोगामी स्त्री, चित्रित करुन स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा, समानतेचा आणि विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार करणे. शैक्षणिक सुधारणेचे आणि अस्पृश्यता निर्मूलनाचे महत्व पटवून देणे, शेतकऱ्यांच्या अज्ञानाचे उच्चाटन करणे, व्यसनाधिनतेचे दुष्परिणाम दाखविणे असे प्रचलित महत्वाचे विषय या काळात मराठी रंगभूमीवर अवतरलेले दिसतात. उदा. गो.ब.देवलांचे 'शारदा' या नाटकाला तत्कालीन एका वयोवृद्ध संस्थानिकाने बालिकेबरोबर विवाह केल्याची बातमी कारणीभूत ठरली. म्हणजे तत्कालीन सामाजिक परिस्थितीतच त्या त्या नाट्यकृतीची बीजे सापडतात. स्त्रीविषयक प्रश्नाविषयी लोकहितवादी, म. फुले, विष्णुशास्त्री पंडित, डॉ. रा.गो. भांडारकर, न्या. रानडे, गो.ग. आगरकर आदी सुधारकांनी व विचारवंतानी स्त्रियांवरील अन्यायाला वाचा फोडून स्त्री-शिक्षण, बालविवाह, अस्पृश्यता आणि व्यसनाधिनता इत्यादी प्रश्नांविषयी समाजजागृतीचे प्रयत्न सुरु केले. याचा परिणाम म्हणून महात्मा जोतीबा फुले यांचे 'तृतीयरत्न' (१८५५), म.बा.चितळे यांचे 'मनोरमा' (१८७१), अण्णा मार्तंड जोशी यांचे 'सं. सौभाग्यरमा अथवा वैधव्यदु:ख विमोचन' (१८८४), पु.भा. डोंगरे यांचे 'जरठोद्वाह नाटक' (१८९०), गो.ब.देवलांचे 'शारदा' (१८९९), द.ज.मराठे यांचे 'सं.रुढविनाशन' (१९००), श्री. कृ. कोल्हटकरांचे 'परिवर्तन' (१९१७) के. सी. ठाकरे यांचे 'विधिनिषेध नाटिका' (१९३४) इ. अशा अनेकविध नाट्यकृती उदयाला आल्या. म्हणजे समाजजीवनातील या विविध प्रश्नांची उलट-सुलट होणारी चर्चा, नवशिक्षितांकडून सुधारणांचा पुरस्कार आणि सनातन्यांकडून त्यांना होणारा अशा नव्या-जुन्यांच्या मतसंघर्षाने जे

वातावरण भरुन गेले होते, त्या सामाजिकतेचा तत्कालीन काळात उदयाला आलेल्या विधि नाट्यकृतीवर परिणाम झाला आहे. 'सौभाग्यरमा' नाटकाचे लेखक अण्णा मार्तंड जोशी नाटकाच्या प्रस्तावनेत लिहितात,'' नाट्यकविपद प्राप्तीची इच्छा धरुन रसिकजनास येथेच्छ नवरसपान करविण्याकरताच केवळ हा यत्न नसून आमच्या अनाथ विधवा भगिनीचे दु:खोद्‌गार आमच्या आर्यबंधूच्या कानावर पडून त्यांचा योग्य परिणाम व्हावा. याच हेतूने प्रस्तुत नाट्यप्रबंध लिहिला आहे.''[१२] समाजजागृतीचे आपले असे उद्दिष्ट अनेक नाटककारांनी आपल्या नाटकाच्या प्रस्तावनेतून, तर कधी नांदीत सूत्रधाराच्या तोंडून वदविलेले दिसते.

जनतेसमोर आपल्या सामाजिक समस्यांची जाणीव करुन देणे आणि त्या नष्ट करण्यासाठी अत्यंत सुंदर अशा बोलकी पात्रे निर्माण करुन त्या समस्यांचा निष्पात करणे, नवा विचार सांगणे, अशा गोष्टीनियुक्त याकाळात म राठी रंगभूमीचा अविष्कार झाला आहे. म्हणजे प्रबोधन काळात राजकीय, सामाजिक आणि धार्मिक अशाप्रकारची जी आंदोलने महाराष्ट्रात सुरु होती त्या आंदोलनांचे स्पष्ट प्रतिबिंब मराठी नाटकात उमटलेले दिसते. या संदर्भात श्री. ना. बनहट्टी म्हणतात, ''मराठी रंगभूमी हे मराठी जनतेच्या संस्कृतीचे एक फार महत्वाचे अंग आहे. तिचे परिवर्तन कोणकोणाच्या क्रिया-प्रतिक्रियांनी कसकसे होत गेले हे जाणून घेणे म्हणजे मराठी संस्कृतीच्या एका महत्वाच्या विभागाचे यथार्थ ज्ञान करुन घेण्याप्रमाणे आहे.''[१३] या मतावरुन प्रबोधन चळवळ आणि मराठी नाटक यांच्यातील दृढसंबंध अधिक स्पष्ट होतो.

प्रबोधनकाळातील नाटककारांनी नाटक हे लोकरंजनाबरोबर सामाजिक उद्‌बोधनाचे एक समर्थ साधन म्हणूनच त्याचा उपयोग केला. सामाजिक मनाला आवाहन देणारे आणि त्याच्या काळजाला जाऊन भिडणारे असे अनेक विषय एका बाजूला नाटककाराला प्रेरणा देणारे, तर दुसऱ्या बाजूला प्रेक्षकांना जिव्हाळ्याचे वाटणारे होते. मराठी रंगभूमीवर सादर होणाऱ्या या विषयासंदर्भात के. नारायण काळे लिहितात,'' संस्थानिकांचा आश्रय आणि पुढारलेल्या ब्राम्हण जातीतील नटवर्ग, यामुळे तमाशाच्या रंगभूमीवर अभावाने अस्तित्वात असलेली सद्‌भिरुची रंगभूमीवर प्रस्थापित करता येईल व केवळ उत्ताण श्रृंगारापेक्षा वेगळ्या अशा उदात्त प्रवृत्तींचा कलात्मक आविष्कार करता येईल, अशी अपेक्षा यामागे होती आणि एका विशिष्ट दर्जाचा प्रेक्षकांच्या बाबतीत बऱ्याच मोठ्या प्रमाणात ती सफलही झाली.''[१४] म्हणजे समाजात ज्या ज्या काळी जे प्रश्न आणि ज्या सामाजिक सुधारणेच्या चळवळी उदयाला आल्या त्याचे स्पष्ट प्रतिबिंब मराठी रंगभूमीवर उमटलेले दिसते, म्हणून ''महाराष्ट्रीय समाजाचे गेल्या शंभर वर्षाचे स्वरुप कशाप्रकारचे होते हे पाहावयाचे असेल त्याने आमच्या सामाजिक नाटकांकडे बघावे.''[१५] या वि. पा. दांडेकरांच्या विधानातील मथितार्थ अधिक मर्मग्राही वाटतो.

थोडक्यात नाट्यनिर्मिती हा एक प्रकारे सांस्कृतिक आविष्कार आहे. त्याचा जन्म, त्याचे स्वत्व, त्याची सार्थकता ही सांस्कृतिकतेतच असते. म्हणून सांस्कृतिक स्थितीगतीच्या प्रक्रियेने नाट्यकला कधी कधी प्रभावित होत असते, तर कधी ती सांस्कृतिक स्थितीगतीशी समांतरही असते. या सांस्कृतिक स्थितीगतीचा प्रभाव कधी स्पष्ट असतो तर कधी सूचित असतो. कधी सजान असतो तर कधी अजान असतो. म्हणून नाट्यनिर्मिती हे सांस्कृतिक प्रभावनियतेचे गमक आहे. यातून प्रबोधन चळवळ आणि मराठी नाटक यांचा अनुबंध स्पष्ट होतो.

-●●●●●-

**संदर्भ सूची**

१. बनहट्टी श्री. ना., *मराठी नाटयकला आणि नाट्यवाङ्मय, पुणे, प्रका. पुणे विद्यापीठ, १ली आ., १९५९, पृ.१०२.*

२. बनहट्टी श्री. ना., *लेख–मराठी नाटकाची घटनाः १८४३–१९३०, मराठी रंगभूमी : मराठी नाटकः घटना आणि परंपरा, संपा. वा.ल.कुलकर्णी व इतर, मुंबई, प्रका. मुंबई मराठी साहित्य संघ,१ली आ., १९७१,पृ.६.*

३. कुलकर्णी भीमराव, *(प्रस्ता) मराठी फार्स, पुणे, महाराष्ट्र साहित्य परिषद, १ली आ., १९८७,पृ.६.*

४. मनोहर जाधव, *मराठी नाटक मुंबई, प्रका. अरविंद तेंडूलकर, १ली आ., १९८७,पृ.२८*

५. कुलकर्णी गो.म., *वाटा आणि वळणे, बेळगाव, नवसाहित्य प्रकाशन, १ली आ., १९७५,पृ.११६.*

६. बनहट्टी श्री. ना., *उनि., पृ.२५*

७. देशमुख अनंत, *लेख–सांस्कृतिक संदर्भ व मराठी नाटक,साहित्यचिंतन, संपा. व.दि.कुलकर्णी, मुंबई, प्रका. मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ, १ली आ., १९८३,पृ.५८*

८. काळे के. नारायण, *लेख–मराठी नाटक आणि मराठी रंगभूमी, समीक्षाः मराठी नाटक आणि मराठी रंगभूमी, संपा. वा.ल.कुलकर्णी व इतर मुंबई, पॉप्युलर प्रकाशन, १ली आ., १९६३,पृ.३२*

९. दांडेकर वि.पा. *मराठी नाट्यसृष्टी : सामाजिक नाटके, बडोदा, प्रका. वि.पा.दांडेकर, २ री आ., १९५७,पृ.४५१*

१०. जोग रा.श्री., *मराठी वाड.मयाचा इतिहास, खंड ४ था, पुणे, महाराष्ट्र साहित्य परिषद, २ री आ., १९७३, पृ४१२.*

११. पेंडसे लालजी, *साहित्य आणि समाजजीवन, मुंबई, प्रका. अ.ज. आवडे, १ली आ., १९३५,पृ.१७*

१२. जोशी अण्णा मार्तंड, *संगीत सौभाग्यरमा अथवा वैधव्यदुःख विमोचन, मुंबई, निर्णयसागर प्रकाशन, १८८४, प्रस्तावना*

१३. बनहट्टी श्री.ना., *मराठी नाट्यकला आणि नाट्यवङ्मय पुणे प्रका. पुणे विद्यापीठ, १ली आ., १९५९,पृ.४३*

१४. काळे के. नारायण, *उनि., पृ.२८*

१५. दांडेकर वि.पा., *उनि., पृ.१४.*